## सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३.

## मी शपथेवर कथन करतो की,

**नाव —** शिवराज भैरु मगदूम.

**वय** - ४३ वर्ष, **व्यवसाय** - शेती,

**राहणार.**- निंगुडगे, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**सरतपास— श्री.एस.बी. कांबळे, सरकारी वकील यांच्यामार्फत.**

**१.** मी आरोपींना ओळखतो. ते आज न्यायालयात हजर आहेत. आरोपी क्र. १ हा जनावरांचा व्यापारी असल्यामुळे मी एप्रिल २०२२ मध्ये पैशांची अडचण असल्यामुळे त्याला माझ्या गाभण गायीची ४५,०००/– रुपयांना विक्री केली होती. त्याने मला टप्याटप्याने ४०,०००/– रुपये दिले होते. तो उर्वरीत ५,०००/– रुपये देण्यास टाळाटाळ करीत होता. मी त्याला पैसे मागण्यास फोन केला असता, तो माझा फोन घेत नव्हता तसेच फोन बंद करुन ठेवत होता.

**२.** दि. २८.०६.२०२२ रोजी आरोपी क्र. १ आमच्या गावात माझे चुलते नारायण मगदूम यांच्या घरी गाय खरेदी करण्यासाठी आला होता. त्यावेळी मी त्याला भेटून माझे उरलेले पैसे देऊन चुलत्यांच्या खरेदी केलेल्या गायीचे पैसे ताबडतोब दयायला सांगितले होते. त्यावेळी त्याने, 'तुझे कुठले पैसे' असे म्हणून माझी गळपट धरली होती. आमची भांडणे चुलते नारायण मगदूम यांनी सोडवली होती. मी त्यानंतर घरी गेलो होतो.

**३.** मी दुपारी ०२.३० वाजता शेतातून वैरण घेऊन घराच्या परडयात आलो होतो. त्यावेळी तेथे आरोपी क्र. १ इतर दोन लोकांसोबत उभा असताना, आरोपी क्र. १ व २ यांनी, 'तुझे कुठले पैसे' असे म्हणून आरोपी क्र. २ ने कोळप्याच्या लाकडी दांडक्याने माझ्या डोक्यावर दोन ते तीन वेळा मारले होते. त्याने नंतर त्याच काठीने माझ्या डाव्या डोळयाजवळ आणि दोन्ही पायांवर मारले होते.

**४.** त्यांनी मारहाण केल्यामुळे मी आरडाओरडा केला असता गावातील मधुकर देसाई, धनाजी देसाई, छाया परीट आणि माझी आई तेथे आली होती. आईने मला सोडविले होते. त्यावेळी आरोपींनी मला पुन्हा पैसे मागितल्यास जिवे मारण्याची धमकी दिली होती. त्यामुळे गावातील पोलिस पाटलांकडे तक्रार दयायला गेल्यावर त्यांनी मला पोलिस स्टेशनला पाठविले

होते. मी दुपारी ०४.०० ते ०४.३० वाजेच्या दरम्यान पोलिस ठाण्यात आलो होतो. त्यांनी मला तेथून सरकारी दवाखान्यात पाठविले होते. डॉक्टरांनी तेथे माझी तपासणी केल्यानंतर मला पुन्हा पोलिस ठाण्यात पाठविले होते. मी पोलिस ठाण्यात आल्यानंतर पोलिसांनी माझी फिर्याद नोंदवून घेतली होती. आता मला मी दिलेली फिर्याद दाखवली, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्याला नि. क्र. पी–२१ देण्यात येतो.

**५.** मला आरोपींनी मारहाण केलेली कोळप्याची काठी दाखवल्यास मी ओळखू शकतो. आता मला ती काठी दाखवली, मला त्याच काठीने मारहाण झालेली आहे. साक्षीदाराने काठी ओळखल्यामुळे तिला वस्तू क्र. अ देण्यात येतो.

**सरतपास पुर्ण.**

**<u>आरोपींतर्फे उलटतपास – श्री. डी. जे. देसाई यांच्यामार्फत.</u>**

**६.** माझ्या घराच्या आजूबाजूला दादू धोंडिबा भोसले व बसवंत दत्तू भोसले यांची घरे व समोर बसवेश्वर मंदिर आहे. मधुकर देसाई, धनाजी देसाई व छाया परीट यांची मंदिराच्या बाजूच्या गल्लीत घरे आहेत. आरोपी गडहिंग्लज तालुक्यातील तेरणी गावचे आहेत. ते जनावरांच्या व्यापारामुळे आमच्या गावात येत असतात. मी गावामध्ये आरोपींनी कोणाचे पैसे बुडवले असे ऐकलेले नाही.

**७.** हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ ने मला खरेदी केलेल्या गायीची संपुर्ण रक्कम दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्याने माझे पैसे दिलेले असल्यामुळे तो माझ्या चुलत्याची गाय खरेदी करण्यासाठी आला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी सकाळी माझ्या चुलत्यां सोबत केलेला व्यवहार पुर्ण करण्यासाठी दुपारी ०२.३० वाजता पुन्हा आमच्या गावात आले होते.

**८.** हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी माझ्या म्हैशीला घेऊन पाणी पाजण्यासाठी जात होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आरोपी खरेदी केलेली गाय गाडीमध्ये भरत होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझी म्हैस बुजल्यामुळे ती मला ओढत घेऊन गेली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझ्या डोक्याला, तोंडाला व पायाला जखमा झाल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी आज देखील आमच्या गावात व्यापारासाठी येतात.

**९.** हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ वरचा खोटा राग काढण्यासाठी मला म्हशीने ओढून केलेल्या जखमांचा गैरफायदा घेण्यासाठी मी खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझे कधीही ५,०००/– रुपये देणे लागत नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला कधीही मारहाण केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यांनी केलेल्या मारहाणीमुळे लोकांनी जमल्यानंतर आईने मला सोडविल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिसांकडे खोटी तक्रार देऊन डॉक्टरांकडून खोटे वैद्यकीय प्रमाणपत्र घेतले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी तक्रार दाखल करुन आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – २०.०९.२०२४.

(आर. पी. थोरे)

आजरा.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.